**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**

**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** औरंगाबाद ग्रामीण  **P.S.(ठाणे):** कन्नड सिटी

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0312  **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिंनाक आणि वेळ):**16/10/2026 19:48

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शुक्रवार  **Date From (दिंनाक पासून):** 16/10/2026

**Time Period (कालावधी):** पहर 4  **Date To ( दिंनाक पर्यंत):** 16/10/2026

**Time From (वेळेपासून):** 12:22 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 12:22 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिंनाक ):** 16/10/2026  **Time (वेळ):** 19:22 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 032

**Date & Time (दिंनाक आणि वेळ):** 16/10/2026 19:22 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

उत्तर, 150 किमी  **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** तहसील कार्यालय, कन्नड ताकन्नड,मुख्य दरवाजा समोरील पडीत ट्रक

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): अमोल पांडुरंग सोनवणे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1988

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबधक विभाग, छ सं,कन्नड सिटी,औरंगाबाद ग्रामीण,महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबधक विभाग, छ सं,कन्नड सिटी,औरंगाबाद ग्रामीण,महाराष्ट्र, भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9764555100

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | शिवाजी नागनाथ टोम्पे | | | 1. तडखेल ता देगलुर जि नांदेड, पद-वनपरिक्षेत्र अधिकारी, कन्नड,कन्नड सिटी,औरंगाबाद ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | लोकसेवक यांचे अंगझडतीत रोख /लाच रक्कम 5000/ रुपये मिळाले | 5,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

5,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

दि. 16/10/2026

फिर्याद

मी अमोल पांडुरंग सोनवणे, वय 38 वर्ष, व्यवसाय नोकरी, पद- पोलीस निरीक्षक, नेमणुक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर, मो.नं. 9764555100

मी वरील प्रमाणे असुन, दि.14/10/2026 रोजी मा.पोलीस अधीक्षक ला.प्र.वि.छत्रपती संभाजीनगर यांनी आम्हास तक्रारदार श्री. अजीम मजीद शेख, वय 54 वर्षे, व्यवसाय लाकुड खरेदी विक्री व्यापारी, रा.करीम नगर, कन्नड ता. कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर यांचा मो.नं. 9975660286 हा दिला व त्यांच्या तक्रारी प्रमाणे पुढील कारवाई करण्याचे तोंडी आदेशीत केले. त्याप्रमाणे आम्ही दिंनाक 14/10/2026 रोजी तक्रारदार यांचेशी संपर्क करुन त्यांची तक्रार ऐकुन घेतली. तसेच तक्रारदार यांनी सांगितले की, मी आज कन्नड वन विभागाचे आर.एफ.ओ. श्री. शिवाजी टोम्पे साहेब यांना भेटण्याकरीता जाणार आहे. तरी आपण कन्नड येथे आज यावे असे सांगितल्याने आम्ही दिंनाक 14/10/2026 रोजी दोन पंचाची सेवा उपलब्ध करुन घेतली. त्यानंतर आम्ही सापळा पथक व पंच असे कन्नड येथे जाण्याकरीता शासकीय वाहनाने रवाना झालो. कन्नड येथे गेल्यानंतर तेथे तक्रारदार यांची भेट घेवून त्यांना सापळा पथक व पंचांची ओळख करुन दिली. तसेच पंचांना देखील तक्रारदार यांची ओळख करुन दिली. त्यानंतर तक्रारदार यांनी त्यांची तक्रार तोंडी सांगितली. सदरची तक्रार मी दोन पंचासमक्ष ऐकुन घेतली व तक्रारदार यांनी त्यांचेकडे होत असलेल्या लाच मागणीची लेखी तक्रार दिली ती पुढील प्रमाणे- मी अजीम मजीद शेख, वय 54 वर्षे, व्यवसाय लाकुड खरेदी विक्री व्यापारी, रा.करीम नगर, कन्नड ता.कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर मो.नं. 9975660286

"´ÖB वरील प्रमाणे असुन, लाकुड खरेदी विक्री व्यवसायाचे काम करतो. मी मागील 10 ते 12 वर्षापासुन लाकुड खरेदी विक्रीचा व्यवसाय करतो, मी स्थानिक शेतकरी यांचेकडून त्यांचे शेतातील लाकडांची खरेदी करतो. खरेदी केलेले लाकुड एकत्रीत करुन ते इतर जिल्ह्यातील लाकुड व्यापाऱ्याला विक्री करतो. त्याबाबतचे माझ्याकडे लाकुड खरेदी विक्रीचे शॉपऍक्ट परवाना आहे. तसेच लाकडांचे खरेदी विक्रीचे व्यवसाय मी माझ्याकडे MH-06-AG-3936 टाटा मोटर्स गुड्स कॅरीयर ट्रान्सपोर्ट या वाहनाने लाकडांची वाहतूक करीत होतो. परंतू मला माझ्या वयक्तीक कारणांमुळे सदरचे वाहन विक्री करावे लागले. सध्या मी स्थानिक शेतकरी यांचेकडून त्यांचे शेतातील लाकडे तोडून घेवून येणेकरीता भाडेतत्वावर वाहने वापरुन लाकडे खरेदी करतो. तसेच माझ्याकडे उपलब्ध असलेल्या लाकडांची इतर जिल्ह्यात विक्रीकरीता तेथील लाकुड खरेदी व्यापाराचे वाहनाचा वापर करतो.

मी लाकडांचा खरेदी विक्रीचा व्यवसाय करतो त्यामुळे कन्नड वन विभागाचे आर.एफ.ओ. श्री.शिवाजी टोम्पे साहेब यांनी मला अंदाजे एक महिन्या पुर्वी भेटण्याकरीता बोलविले होते. भेटी दरम्यान त्यांनी मला माझ्या तोडलेल्या लाकडांची स्थानिक वाहतुक करायाची असल्यास तसेच विक्री केलेले लाकडांची इतर जिल्ह्यात वाहतूक करायची असल्यास सदर वाहनावर वन विभागामाफत कोणतीही कारवाई न करण्याकरीता 7000/- रुपये प्रति महिना याप्रामाणे मला पैसे द्यावे लागेल असे सांगितले. परंतू मला त्यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने मी पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर येथे तक्रार देण्यासाठी संपर्क केला.

त्यानंतर आज दिंनाक 14/10/2026 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर येथील पोलीस

निरीक्षक श्री.अमोल सोनवणे, यांनी माझ्याशी संपर्क केला त्यांना माझ्याकडे होत असलेल्या लाच संबंधी माहिती दिली. तसेच मला कन्नड वन विभागाचे आर.एफ.ओ. श्री. शिवाजी टोम्पे यांचा फोन आला असून मी त्यांना भेटण्यास आज जाणार आहे. तर तुम्ही आज कन्नड येथे यावे असे सांगितले.
त्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालयाचे पोलीस पथक पंचासह दिनांक 14/10/2026 रोजी कन्नड येथे आले. मी त्यांचेकडे माझ्या वरील घटनेची लेखी तक्रार देत आहे. माझा कन्नड वन विभागाचे आर.एफ.ओ. श्री.टोम्पे साहेब यांचेसोबत पैशाचा देण्याघेण्याचा व्यवहार नाही किंवा वैर दुश्मनी नाही. मी आज रोजी आर.एफ.ओ.श्री.शिवाजी टोम्पे साहेब यांना भेटण्यासाठी कन्नड वन विभागाचे कायलिय येथे जाणार आहे. त्यांनी मला खरेदी केलेले लाकुड वाहतुक करणेकरीता तसेच इतर जिल्ह्यातील लाकुड व्यापारी यांना विक्री केलेले लाकडाचे वाहन कन्नड वन विभागाच्या हद्दीच्या बाहेर काढुन देण्यासाठी तसेच वाहनावर कन्नड वन विभागाची कोणतीही कारवाई न करणेकरीता पैशाची/लाचेची मागणी केल्यास त्यांचेवर योग्य कारदेशीर कारवाई करावी हि विंनती आहे. तसेच मी माझ्याकडील विक्री केलेल्या वाहनाचे आर.सी. तसेच लाकुड खरेदी विक्री करीताचे शॉप ऍॅक्ट परवाना सादर करीत †ÖÆêü" अशा मजकुराची लेखी तक्रार दिली.
तक्रारदार यांनी दिलेल्या वरील तक्रारीच्या अनुषंगाने तक्रारीतील अभिकथील लोकसेवक श्री. टोम्पे यांची लाचमागणी पडताळणी करण्याचा निणय घेण्यात आला. त्यावेळी आम्ही तक्रारदार, दोन्ही पंच, व सापळा पथकातील सदस्य यांना लाचमागणी पडताळणीच्या अनुषंगाने प्रक्रिया सांगुन, सुचना दिल्या. त्यानंतर दोन्ही पंचासमक्ष व्हाईस रेकॉर्डरमध्ये नवीन मेमरीकार्ड टाकुन, व्हाईस रेकॉर्डर चालू करुन तक्रारदार यांचे अंगावर लपवुन दिला. त्यानंतर तक्रारदार व पंच क्र.1 शेख अन्वर मोईनोद्दीन यांना अभिकथीत लोकसेवक श्री. टोम्पे यांच्या लाचमागणी पडताळणीसाठी तक्रारदार यांचेकडील मोटार सायकलने दि.14/10/2026 रोजी 12.05 वा.सुरक्षित ठिकाण कन्नड येथून रवाना केले.
त्यानंतर तक्रारदार व पंच क्र.1 हे लाचमागणी पडताळणीहून 12.20 वा.सुरक्षित ठिकाणी परत आले. त्यावेळी तक्रारदार यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर काढुन बंद केला. व पंच क्र.1 शेख अन्वर मोईनोद्दीन यांना सुरक्षित ठिकाणाहुन गेल्यापासुन परत येई पर्यंत काय घडले याची विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, मी व तक्रारदार हे त्यांचेकडील मोटार सायकलने कन्नड वन विभागाचे आर.एफ.ओ.श्री. टोम्पे यांना भेटण्याकरीता त्यांचे कार्यालयात गेलो असता श्री.टोम्पे यांनी तक्रारदार यांना त्यांचे खरेदी विक्री केलेल्या लाकडांची वाहतुक करणेकरीता वापरण्यात येणाऱ्या वाहनांवर कारवाई न करण्याकरीता प्रति महिन्याप्रमाणे 7000/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडी अंती 5000/- रुपये लाचेची मागणी केली. त्यावेळी तक्रारदार म्हणाले की, किती हे असे म्हणल्यानंतर लोकसेवक श्री. टोम्पे म्हणाले की, नाहीतर हाई ते महिने वाईज करुन टाका त्यावर तक्रारदार किती असे म्हणाले त्यावर लोकसेवक श्री. टोम्पे सहा हजार ,सात हजार ,सहा हजार राहुदतो तुमच्या साठी ,बस असे म्हणाले, त्यावर तक्रारदार हा थोडस कस हया वर्षी धंदे पाणी नाही असे म्हणाले, त्यावर लोकसेवक श्री. टोम्पे तुमच्या साठी सहा हजार म्हटलो ना , मालेगाव साठी दया नाही बघा माझ्याकडे असे म्हणाले, त्यावर तक्रारदार बराबर असे म्हणाले त्यावर लोकसेवक श्री. टोम्पे ते आपले इथले नाहीत ना असे म्हणाले त्यावर तक्रारदार हां ओ असे म्हणाले त्यावर लोकसेवक श्री.टोम्पे आता मला सांगा महिण्याभरात किमान पाच -सहा ट्रीप तरी करतील ना असे म्हणाले त्यावर तक्रारदार हा ओ असे म्हणाले त्यानंतर लोकसेवक श्री. टोम्पे येणंच नाही मग ,गाडी तीच राहणार आहे किं गाडी बदलणार आहे असे म्हणाले त्यावर तक्रारदार गाडी बदलनार आहे असे म्हणाले त्यावर लोकसेवक श्री. टोम्पे कोई इशु नही ,कारण आमचा एक्स्ट्रा लोड वाढतो ना असे म्हणाले त्यावर तक्रारदार तिंकड कधी जाणार आहे मग असे म्हणाले त्यावर लोकसेवक श्री.टोम्पे कुठे असे म्हणाले त्यावर तक्रारदार संभाजीनगरला चालले ना ,किती वाजता असे म्हणाले त्यावर लोकसेवक श्री. टोम्पे अर्ध्या तासाने असे म्हणाले त्यावर तक्रारदार अर्धा तास हे ,मग उद्या भेटु का तिन चार वाजता ,नही आता तुम्ही थांबत असेल तर मग असे म्हणाले त्यावर लोकसेवक श्री. टोम्पे आनले का आनायाचे असे म्हणाले त्यावर तक्रारदार नाही येवु लागले ,एका कडुन सांगितले त्याला असे सांगितले त्यावर लोकसेवक श्री. टोम्पे किती वेळ हे असे म्हणाले अर्धा एक तास म्हणी तो , कारण मला द्यायाचे धंदा चालू नाही बंद हे माझा असे म्हणाले त्यावर लोकसेवक श्री. टोम्पे एक तासांनी असे म्हणाले त्यावर तक्रारदार मी फोन करतो तुम्हाला असे म्हणाले त्यावर लोकसेवक श्री. टोम्पे बर असे सांगितले. त्यानंतर मी व तक्रारदार परत आलो असे सांगितले. त्यानंतर तक्रारदार यांना विचारणा केली असता त्यांनी पंच क्र.1 यांचे प्रमाणे हकीकत सांगितली.
त्यानंतर तक्रारदार व दोन्ही पंच यांचे समक्ष लाचमागणी पडताळणीतील संभाषण ऐकले त्यात तक्रारदार यांना वनपरिक्षेत्र अधिकारी, कन्नड श्री. शिवाजी टोम्पे यांनी तक्रारदार यांचे लाकुड खरेदी विक्रीकरीता असलेल्या वाहनांवर तसेच इतर जिल्ह्यातील लाकडांची वाहतुक करणाऱ्या वाहनांवर कन्नड वन विभागाची कोणतीही कारवाई न करण्याकरीता प्रति महिना 7000/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडी अंती 5000/- रुपये लाचेची मागणी

करुन स्विकारण्याचे लाचमागणी पडताळणी संभाषणावरुन स्पष्ट झाले. लाचमागणीतील तक्रारदार व वनपरिक्षेत्र अधिकारी, कन्नड श्री. टोम्पे यांचेतील संभाषणाची स्क्रिप्ट काढुन, पंचासमक्ष सविस्तर लाचमागणी पंचनामा तयार करण्यात आलेला आहे. त्यानंतर लोकसेवक श्री. टोम्पे हे कार्यालयात उपलब्ध नसल्याने पुढील सापळा कारवाई सर्वानुमते दिंनाक 15/10/2026 रोजी कन्नड, ता कन्नड जि छत्रपती संभाजीनगर येथे येवून करण्याचे तरले त्यानंतर दिंनाक 15/10/2026 रोजी कन्नड येथील सुरक्षीत ठिकाणी सापळा कारवाई कामी तक्रारदार, पंच व सापळा पथक यांना सुचना देवून तक्रारदार यांना लोकसेवक श्री. टोम्पे यांना भेटण्यासाठी ते कुठे आहेत. हे विचारणा करणे करीता तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईल फोनवरुन लोकसेवक श्री. टोम्पे यांचा संपर्क करुन माहिती घेतली असता लोकसेवक श्री.टोम्पे यांनी तक्रारदार यांना फोनवर सांगितले की, मी छत्रपती संभाजीनगर येथे मिटींगमध्ये आहे मी कॉल करतो मग भेटतो असे सांगितले. त्यानंतर दिंनाक 15/10/2026 रोजी 18:00 वा. पावेतो लोकसेवक श्री. टोम्पे यांची वाट बघीतली असता, तक्रारदारास त्यांचा फोन आला नाही. त्यामुळे दिंनाक 15/10/2026 रोजीची सापळा कारवाई स्थगीत करण्यात येवून सर्वानुमते सदरची सापळा कारवाई दिंनाक 16/10/2026 रोजी करण्याचा निंणण् घेण्यात आला.

त्यानंतर दिंनाक 16/10/2026 रोजी नियोजीत केलेल्या सापळा कारवाईत पंचासमक्ष तक्रारदार यांनी वनपरिक्षेत्र अधिकारी कन्नड श्री. टोम्पे यांची भेट घेणेकरीता वन परिक्षेत्रीय कार्यालय, कन्नड येथे येथे गेले असता नमुद कार्यालय येथे लोकसेवक श्री. टोम्पे यांची भेट झाली नाही. त्यानंतर यातील तक्रारदार यांनी लोकसेवक श्री. टोम्पे यांना फोनद्वारे संपर्क केला असता, लोकसेवक यांनी फोन उचलल्यावर तक्रारदार त्यांना कुठ आहे ऑफीसला आलतो बस किती टाईम लागेल त्यावर लोकसेवक श्री. टोम्पे हां या, असे म्हणाले त्यावर तक्रारदार कोणत्या ठिकाणी असे म्हणाले त्यावर लोकसेवक श्री. टोम्पे या ना समोरच या असे म्हणाले त्यावर तक्रारदार तहसील मधी ना असे म्हणाले त्यावर लोकसेवक श्री. टोम्पे हं असे म्हणाले त्यावर तक्रारदार ओके ओके असे म्हणाले त्यावर लोकसेवक श्री. टोम्पे यांची तहसील कार्यालयाच्या समोर तक्रारदार व पंचासमक्ष प्रत्यक्ष भेट झाली त्यावर तक्रारदार जय हिंद सर असे म्हणाले त्यावर लोकसेवक श्री. टोम्पे काल मिटींग होती असे म्हणाले त्यावर तक्रारदार असं असे म्हणाले त्यावर लोकसेवक श्री. टोम्पे काम काम सारख असे म्हणाले त्यावर तक्रारदार हा नां गाडी आज येणार हे पाच हे पाच हजार हे मोजुन घ्या असे म्हणाले त्यावर लोकसेवक श्री. टोम्पे नोटां मोजुन हासण्याचा आवाज येतो त्यावर तक्रारदार गाडी दुसरी येणार हे मी तीचा नंबर नंतर देतो असे म्हणाले त्यावर लोकसेवक श्री. टोम्पे चालतय असे म्हणाले.

त्यानंतर लोकसेवक श्री. टोम्पे यांनी तक्रारदार यांचेकडून पंचासमक्ष लाकुड खरेदी विकीकरीता वापरण्यात येणाऱ्या वाहनांवर तसेच इतर जिल्ह्यातील लाकुड खरेदी करण  करण्यात येणाऱ्या वाहनांवर वन विभाग कन्नड यांचेकडुन कोणतीही कार्यवाही न करणेकरीता पंचासमक्ष 5000/- रुपये लाचेची रक्कम तहसील कार्यालय, कन्नड ता.कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर समोर वनपरिक्षेत्र अधिकारी, कन्नड ता.कन्नड जि.छत्रपती संभाजीनगर श्री. टोम्पे यांनी लाचेची रक्कम स्वत: स्विकारली. त्यानंतर तक्रारदार यांनी लाच स्विकारल्याचा पुर्व नियोजीत इशारा केला. त्यावेळी आम्ही व सापळा टीम तात्काळ घटनास्थळी हजर झालो. त्यावेळी श्री.टोम्पे वनपरिक्षेत्र अधिकारी, कन्नड ता.कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर यांना तहसील कार्यालय, कन्नडच्या समोरील परिसरातून लाचेच्या रकमेसह पंचासमक्ष ताब्यात घेण्यात आले.

त्यानंतर लोकसेवक श्री. टोम्पे, वन परिक्षेत्र अधिकारी, कन्नड यांना आमचा परिचय दिला. तसेच त्यांचे नाव गाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव शिवाजी नागनाथ टोम्पे, वय -35 वर्षे, व्यवसाय नौकरी, पद-वनपरिक्षेत्र अधिकारी, कन्नड, ता.कन्नड,जि.छत्रपती संभाजीनगर मो.नं. 7020132107 असा सांगितला. त्यानंतर तक्रारदार यांचेकडून स्विकारलेल्या लाचेच्या रकमेबाबत लोकसेवक श्री. शिवाजी नागनाथ टोम्पे, वनपरिक्षेत्र अधिकारी, कन्नड ता.कन्नड जि.छत्रपती संभाजीनगर यांना विचारण केली असता, त्यांनी सदरची लाचेची रक्कम लोकसेवक श्री.शिवाजी नागनाथ टोम्पे यांनी अंगात परिधान केलेल्या काळ्या रंगाची जिन्स पॅन्टच्या पाठीमागील उजव्या खिश्यात ठेवली असल्याचे सांगितले. त्यावेळी दोन्ही पंचासमक्ष सदरची लाचेची रक्कम ताब्यात घेऊन पुढील कार्यवाही करुन त्याबाबत सविस्तर घटनास्थळ पंचनामा करण्यात आलेला आहे.

तरी लोकसेवक श्री. शिवाजी नागनाथ टोम्पे, वनपरिक्षेत्र अधिकारी, कन्नड, ता.कन्नड जि.छत्रपती संभाजीनगर यांनी तक्रारदार श्री. अजीम मजीद शेख, वय 54 वर्षे, व्यवसाय लाकुड खरेदी विक्री व्यापारी, रा.करीम नगर, कन्नड ता. कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर मो.नं. 9975660286 यांचे स्थानिक लाकुड खरेदी विक्री करीता वापरण्यात आलेल्या वाहनांवर तसेच इतर जिल्ह्यामध्ये खरेदी-विक्री केलेल्या लाकडांकरीता वापरण्यात येणाऱ्या वाहनांवर कन्नड वन विभागाची कोणत्याही प्रकारची कारवाई न करणेकरीता 7000/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडी अंती 5000/- रुपये लाच मागणी पंचासमक्ष दिंनाक 14/10/2026 रोजी करुन दिंनाक 16/10/2026 रोजी

12:22 वा. तहसील कार्यालय, कन्नड ता.कन्नड जि.छत्रपती संभाजीनगर मुख्य दरवाजा समोरील पडीत ट्रॅक्टर ट्रॉलीच्या बाजुला लोकसेवक श्री. टोम्पे यांनी पंचासमक्ष 5000/- रुपये लाच रक्कम स्वत: स्विकारली, म्हणून माझी लोकसेवक श्री. शिवाजी नागनाथ टोम्पे, वय -35 वर्षे, व्यवसाय नौकरी, पद-वनपरिक्षेत्र अधिकारी, कन्नड, ता. कन्नड जि छत्रपती संभाजीनगर यांचे विरुध्द कलम - 7 भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 प्रमाणे सरकार तर्फे कायदेशीर फिर्याद आहे.

फिर्याद दिली सही.

13\. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

**(1) Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

ARATI RAJENDRA PAWAR(Dy. SP (Deputy Superintendent of Police)) / DYSP **or (किंवा)**

**(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

**(4) Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

18/11/2024

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

15. **Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Registered by (नोंदणी अधिकारी)**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** ARATI RAJENDRA PA
**Rank(पद):** Dy. SP (Deputy Super
**No.(सं.):** DYSP

पोलीस ठाणे अमलदार
पोलीस स्टेशन कन्नड शहर
छत्रपती संभाजीनगर (ग्रामीण)